**महाराष्ट्र विधानमंडळाच्या अमृतमहोत्सवी वर्षाचा (Platinum Jubilee Year)**
**उद्‌घाटन समारंभ दिनांक १८ ऑक्टोबर, २०११ सायंकाळी ०५.३० वाजता**
**विधान भवन, मुंबई.**

# मा.सभापती यांचे भाषण

महाराष्ट्र विधानमंडळाच्या इतिहासातील एका दैदीप्यमान पर्वाच्या शुभारंभप्रसंगी आज व्यासपीठावर उपस्थित असलेल्या भारताच्या राष्ट्रपती मा.श्रीमती प्रतिभाताई पाटील, राज्यपाल मा. श्री. के. शंकर नारायणन, माझे सहकारी विधानसभेचे अध्यक्ष, मा. श्री.दिलीप वळसे-पाटील, मुख्यमंत्री, मा.श्री.पृथ्वीराज चव्हाण, उप मुख्यमंत्री मा.श्री.अजितदादा पवार, मा.श्री.देवीसिंह शेखावत, मा.श्री.शरद पवार, कृषी व खाद्य प्रक्रिया मंत्री, भारत सरकार, मा.श्री.विलासराव देशमुख, विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री, भारत सरकार, मा.श्री.पवन कुमार बंसल, संसदीय कार्य मंत्री, भारत सरकार, मा.श्री.मुकूल वासनिक, सामाजिक न्याय मंत्री, भारत सरकार, मा.श्री.प्रफुल्ल पटेल, अवजड उद्योग मंत्री, भारत सरकार, मा.श्री.मुरलीधर भंडारे, राज्यपाल, ओरिसा राज्य, डॉ.डी.वाय.पाटील, राज्यपाल, त्रिपुरा राज्य,मा. मा.श्री.शिवराज पाटील, राज्यपाल, पंजाब राज्य, मा. डॉ.सय्यद अहमद, राज्यपाल, झारखंड राज्य, मा.श्री.प्रतिक पाटील, कोळसा राज्यमंत्री, भारत सरकार, मा.श्री.मिलिंद देवरा, दूरसंचार आणि माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री, भारत सरकार, अन्य राज्यांचे मा.पीठासीन अधिकारी व राज्य मंत्रिमंडळाचे सदस्य, दोन्ही सभागृहांचे विद्यमान व माजी सदस्य, प्रिंट व इलेक्ट्रानिक मिडीयाचे पत्रकार तसेच सर्व निमंत्रित मान्यवर.

बंधु भगिनिंनो, प्रथमतः विधीमंडळ अमृत महोत्सव कार्यक्रम साजरा होत असताना दि.१२ जुलै, २०११ रोजी मुंबईत झालेल्या दूर्देवी बॉम्बस्फोटात मृत्यूमुखी पडलेल्या नागरीकांच्या प्रती मी आदरांजली व्यक्त करतो.

भारताच्या स्वातंत्र्य संग्रामाचा लढा या शहरातून सुरू झाला. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी ब्रिटीशांना "चले जाव" चा इशारा दिला, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना या महानगरात झाली. देशाची आर्थिक राजधानी समजल्या जाणाऱ्या व जगभरातल्या लोकांचे आकर्षण असणाऱ्या या महामुंबईत मी आपले हार्दिक स्वागत करतो.

आज आपण जेथे उभे आहोत तेथेच लोकशाहीचे मंदीर आहे. येथेच देशाच्या जडणघडणीत ज्या मान्यवरांनी भाग घेतला, ज्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्योत्तर काळात अनेक महत्वपूर्ण विषयावर चिंतन केले. सभागृहाच्या माध्यमाने आपल्या भावना व्यक्त केल्या, मतमतांतरे व्यक्त झाली त्या या लोकशाही मंदीरात मी आपले सर्वांचे अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सहर्ष स्वागत करीत आहे.

माझ्या मनात कृतज्ञतेची आणि कर्तव्यपूर्तीची भावना दाटून आली आहे. या संसदीय लोकशाहीने मला आजपर्यंत अनेक मान-सन्मान दिले आहेत. सभागृहाचा सदस्य, सभापती पद देऊन मला समाजाची सेवा करण्याची संधी प्राप्त झाली आहे. हा गौरव माझा नसून मी ज्या सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी सदैव एक कार्यकर्ता म्हणून काम करीत आहे. त्या कार्यकर्त्याच्या रूपाने माझा झालेला हा गौरव आहे.

विधिमंडळाचा अमृत महोत्सवी हा क्षण इतिहासातून भविष्याचा वेध घेणारा व कायम सर्वांच्या लक्षात राहणारा असा हा क्षण आहे. या अमृत महोत्सवी वर्षाचे उद्घाटन मा.राष्ट्रपती महोदयांच्या शुभहस्ते व आपल्या सर्वांच्या उपस्थितीत होत आहे. या क्षणाचे मलाच नव्हे तर आपणा सर्वांना अप्रूप वाटणार आहे.

१८५८ साली इस्ट इंडिया कंपनीची भारतावरील सत्ता संपुष्टात येऊन भारताचा राज्यकारभार थेट ब्रिटीश संसदेमार्फत पाहिला जाऊ लागला. तेव्हापासून देशात संसदीय कार्यप्रणाली अस्तित्वात आली. या कायद्यान्वये १५ सदस्यांची परिषद त्यावेळी स्थापन करण्यात आली. तथापि त्या परिषदेमध्ये ब्रिटीश सदस्यांचा समावेश होता. भुतपूर्व मुंबई प्रांताच्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलची पहिली बैठक २२ जानेवारी, १८६२ रोजी मुंबई येथील टाऊन हॉलच्या दरबार हॉलमध्ये भरली होती. मुंबई प्रांताचे तत्कालीन गव्हर्नर सर जॉर्ज रसई क्लार्क या बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते.

आज त्या परिषदेच्या स्थापनेची आठवण आल्याशिवाय राहणार नाही. ब्रिटीशांच्या विरोधात झालेल्या राजकीय आंदोलनातून सन १९३५ चा Govt. India Act अस्तित्वात आल्यानंतर पुढे २० जुलै, १९३७ रोजी पुणे येथील कौन्सिल हॉलमध्ये दुपारी २.०० वाजता विधानपरिषदेची पहिली बैठक मंगलदास पक्वासा यांच्या अध्यक्षतेखाली झाली होती. १९३५ च्या निवडणूकीत मुंबई प्रांतात बी.जी. ऊर्फ बाळासाहेब खेर यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाला विजय मिळाला होता आणि खेर यांना राज्यपालांनी मंत्रिमंडळ बनविण्यास पाचारणही केले होते. पुढे १९३७-३८ साली काँग्रेस पक्षाने मुंबई प्रांतात मंत्रिमंडळ बनविण्यास अनुमती दिली होती. त्यावेळी द्विस्तरीय मंत्रिमंडळ बनविण्यात आले होते. हा इतिहास आपण नजरेखालून घातला तर अनेक मान्यवर या सभागृहाचे सदस्य होते आणि त्यांनी राष्ट्रीय पातळीवर सर्वोच्च अशी भूमिका बजावली होती. यात स्व. मावळणकर, मोरारजी देसाई, वैकुंठभाई मेहता, गुलजारीलाल नंदा, गणपतराव तपासे, यशवंतराव चव्हाण, पी.के.सावंत, डी.के.कुंटे आदी प्रभुती होते. त्याचवेळेस मुंबई प्रांतातील घटना समितीवर शंकरराव देव, वल्लभभाई पटेल, एन. व्ही. गाडगीळ,के.एम.जेधे, एस. निजलिंगप्पा, एम. आर. मसानी, एच. व्ही. पाटसकर,

डॉ.बाबासाहेब आंबेडकर अशा अनेक मान्यवरांचा या घटना समितीत समावेश होता. या सर्वांचे स्मरण आज अमृत महोत्सवानिमित्तच्या कार्यक्रमात केल्याशिवाय राहवत नाही.

१८६२ ते २०११ हा कालखंड ख-या अर्थाने विधानपरिषदेचा १५० वर्षाचा कालखंड पूर्ण झाल्याने शतकोत्तर सुवर्ण महोत्सव ठरणार आहे. १८६२ ते १९३७ या ७५ वर्षाच्या विधिमंडळाच्या प्रदीर्घ वाटचालीत सर्वश्री. जगन्नाथ शंकर शेठ, जमशेदजी जीजीभॉय, सर माधवराव विंचुरकर, रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक, रावबहादूर गोपाळ हरी देशमुख ऊर्फ लोकहितवादी, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, सर फिरोजशहा मेहता, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, गोपाळ कृष्ण गोखले, डॉ.रामकृष्ण गोपाळ भांडारकर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर असे अनेक दिग्गज सन्माननीय सदस्य म्हणून लाभले.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर वि.स.पागे, दाजीसाहेब चव्हाण, वसंतरावदादा पाटील, शरद पवार, प्रा.ग.प्र.प्रधान, एन.डी.पाटील, नरेंद्र तिडके, कॉ.व्ही.डी.देशपांडे, ग.दि.माडगुळकर, वसंत देसाई, ना.धों.महानोर, रा.सु.गवई, शंकरराव चव्हाण, जयंतराव टिळक, ना.स.फरांदे, उत्तमराव पाटील, सुधीर जोशी, सदानंद वर्दे, दत्ता मेघे या मान्यवरांनी सभागृहाच्या कामकाजात मोलाची भूमिका निभावली आहे.

आज देशात महाराष्ट्र, कर्नाटक, उत्तर प्रदेश, बिहार, जम्मू आणि काश्मिर तसेच आंध्र प्रदेश या सहा राज्यात विधानपरिषद अस्तित्वात आहे. पण अन्य राज्यात ती नाही. दोन सभागृहाची आवश्यकता घटनाकारांनी आपल्या घटनेच्या माध्यमातून अधोरेखित केली होती. अशाप्रकारचे दोन सभागृहे असावीत असे माझे व्यक्तीगत मत आहे. कारण एका सभागृहात झालेल्या निर्णयाचा व त्याच्या गुण-अवगुणाचा नव्याने विचार करण्याची संधी दुसऱ्या सभागृहात उपलब्ध होते. त्यातून

एखादी त्रृटी राहिल्यास ती दूर केली जाऊ शकते. परिषदेत साधारणपणे समाजाच्या वेगवेगळया स्तरातील लोकांचा समावेश असतो आणि त्यांच्या ज्ञानाचा/ अनुभवाचा फायदा या माध्यमाने राज्याला उपलब्ध होतो. स्वातंत्र्यानंतरही अनेक निर्णय होत असताना या सभागृहाने आपला स्वतंत्र ठसा उमटविला आहे. अगदी ताजेच उदाहरण द्यावयाचे झाले तर धरणातील पाण्याच्या वापराच्या अग्रक्रमाविषयीचा मुद्दा या सभागृहात नव्याने चर्चेस आला व मुळ विधेयकात सुधारणा होऊन तो पुन्हा विधानसभेकडे पाठविण्यात आला. अशा एक नव्हे अनेक बाबी दोन सभागृहामुळे मार्गी लागल्याची उदाहरणे सांगता येतील. आज या निमित्ताने काही गोष्टींचा उल्लेख करणे अगत्याचे वाटते. भारतीय लोकशाही परिपक्व आहे, त्यात काही सुधारणा करण्याची आवश्यकता असेल तर ती लोकशाही पध्दतीने केली जाते. त्यातून समाजाच्या तळागाळातील लोकांचा उध्दार व्हावा त्यांना उत्तम सुविधा उपलब्ध व्हाव्यात. कोणीही न्यायापासून वंचित असता कामा नये अशीही मूळ भूमिका आहे. न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्वाने आज आपण मार्गक्रमण करीत आहोत.

निर्वाचित सदस्यांमार्फत आपण आपल्या भावना संसदेपर्यंत पोहचवू शकतो आणि त्यातून विद्यमान कायद्यात सुधारणा घडवून आणू शकतो. हा मार्ग घटनाकारांनी आपणा सर्वांना उपलब्ध करून दिलेला आहे. दोष आणि अवगुण अनेक ठिकाणी असतात म्हणून ही चौकटच मोडीत काढायची जर कोणाची भूमिका असेल तर ती लोकशाहीला मारक ठरणार आहे. व्यक्तीपेक्षा संस्था नेहमीच मोठी असते आणि व्यक्तीने संस्थेपुढे नतमस्तक राहिले पाहिजे. कारण संस्थेमध्ये काम करणारी मान्यवर मंडळी अनेक विचारधारेची असतात आणि त्यातून चांगलेच निर्माण करण्याचा प्रयत्न होतो. लोकशाहीत सत्तारूढ पक्षाएवढेच विरोधी पक्षालाही महत्व आहे. उभय सभागृहात अनेक बाबी, विधेयके व संबंधित संसदीय आयुधांचा

वापर करून जी चर्चा होते त्यावेळी सगळेच विषय बहुमताने नव्हे तर सहमतीने निर्णय केले जात असतात. कधी-कधी विरोधी पक्षांनी व्यक्त केलेल्या भावनेचा आदर करून त्याचाही धोरणात समावेश करण्याची पध्दत आहे, हीच परिपक्व लोकशाही आहे आणि त्या लोकशाहीच्या अनादराची भावना वाढीस लागणे हे संयुक्तीक होणार नाही.

या निमित्ताने आपण अनेक बाबींचा विचार केला पाहिजे. आपल्या राज्याने जे-जे कायदे केले त्यातील काही केंद्र सरकारने आपल्या पातळीवर स्विकार करून त्याची अंमलबजावणी केली आहे. पंचायत राज सुधारणा विधेयक असो, रोजगार हमी योजना असो, माहितीचा अधिकार असो, जमीन सुधारणा विषयक कायदे असोत, कूळकायदा असोत अशा अनेक बाबींचा उल्लेख व त्याचे महत्व आजही सर्वांसमोर आहे. कापूस एकाधिकार योजना आपण अनेक वर्षे राबवित आहोत. त्यावर उभय सभागृहात चर्चाही होत असते. दोष दूर करण्याचे काम आपण करतो. मागासभागाच्या विकासासाठीही आपण या सभागृहात चर्चा करून सर्वांना समान न्याय देण्याचा प्रयत्न करीत असतो ही आपली उपलब्धीच आहे. कै.यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, वसंतरावदादा पाटील, शंकरराव चव्हाण अशा अनेक मान्यवरांनी महाराष्ट्र घडविण्यात मोलाचा वाटा उचलला आहे. या सर्वांचे या प्रसंगी स्मरण करणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

अमृत महोत्सवी वर्षात महाराष्ट्रातील जनतेला जुन्या आठवणीत घेऊन जाण्यासाठी काही निर्णय आम्ही घेतले आहेत. त्यामध्ये गेल्या ७५ वर्षात झालेल्या भाषणांचा एक संग्रह आम्ही प्रकाशित करीत आहोत. यात ७५ निवडलेली भाषणे आहेत. हे काम खूप मोठे आहे, आम्हाला याची जाणीव आहे. म्हणून असाच एक ग्रंथ समारोपाच्या वेळीही तयार करण्याची आमची भूमिका आहे. ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर यांच्या अध्यक्षतेखालील शा.मं. गोठरकर, वसंत देशपांडे, दिलिप

चावरे, प्रकाश जोशी व नागेश केसरी या पाचजणांच्या समितीने ७५ भाषणे निवडण्याचे काम केले आहे.

आज या समारंभात या ग्रंथाबरोबच आजी-माजी सदस्यांची त्या-त्या काळातील आठवणींचा एक संग्रह आम्ही "स्मृतिगंध" या नावाने प्रकाशित करीत आहोत.

सदस्यांनी आपल्या आठवणी पाठविल्या आहेत. त्यांचा ७५ लेखांच्या ग्रंथामध्ये समावेश करुन प्रकाशित करीत आहोत. सर्व सदस्यांनी आठवनींना उत्तम प्रतिसाद दिला आहे.

वि.स.पागे केंद्राच्या वतीने आम्ही विधिमंडळ ते ग्रामपंचायतीच्या नवनिर्वाचित सदस्यांना प्रबोधित करण्याची आमची भूमिका आहे.

महाराष्ट्राच्या विधीमंडळात सध्या अनुभवी सदस्यांबरोबर युवा सदस्याचीं संख्या वाढत आहे व त्यांचा सहभाग आधुनिक सभागृहाच्या कामात सुधारणा करण्याच्या दृष्टीने आम्ही टाकलेले ते एक पाऊल आहे. विश्वविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आम्ही आता विद्यापीठ क्षेत्रात जाऊन विद्यार्थ्यांना संसदीय कामकाजाची माहिती देणार आहोत. त्यासाठी आमचा उपक्रम सुरू आहे.

शेवटी जाता जाता पंडित जवाहरलाल नेहरू यांनी पुणे कौन्सिल हॉल येथे ६ ऑक्टोबर, १९४९ मध्ये सदस्यांना केलेले भाषण आजही सर्वांना दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरणारे आहे. त्या भाषणातील परिच्छेद मी येथे उद्‌धृत करतो. जनतेच्या जिव्हाळ्याच्या मूळ प्रश्नांना हात न घालता केवळ सवंग लोकप्रियता मिळविण्याचे प्रकार नुकसानकारक आहेत... लोकहिताचा कोणताही प्रश्न तुटकपणे अथवा सोईनुसार विचारात न घेता समग्र दृष्टीकोनातून त्याचा विचार केला... कोणत्याही प्रश्नासंदर्भात जनतेचे सहकार्य मागताना जनतेला त्या प्रश्नाच्या सर्व

बाजू समजावून सांगून पूर्णपणे विश्वासात घ्या... जनतेचे प्रश्न सोडविताना जनतेनेच किंमत मोजायची आणि इतरांनी बाजूला रहायचे हे योग्य नाही...

मला वाटते पंडित नेहरूंनी केलेले हे विवेचन आजच्या संदर्भातही निश्चितच महत्वाचं आहे. आज प्रकाशित होत असलेल्या ७५ भाषणांच्या संग्रहात या भाषणाचा आवर्जून समावेश करण्यात आला आहे. राजकीय क्षेत्रात वावरणाऱ्या प्रत्येकाने हे भाषण वाचावे, त्यांना निश्चितच नवा विचार आणि दिशा आजही मिळेल असा मला विश्वास वाटतो.

आमच्या विनंतीला मान देऊन आपण सर्वजण मोठ्या संख्येने या अमृतपर्वात सहभागी झालात, त्याबद्दल आपणा सर्वांना धन्यवाद देतो, सर्वांचे पुनश्च अंतःकरणपूर्वक स्वागत करून आपली रजा घेतो.

धन्यवाद !

जयहिंद ! जय महाराष्ट्र!!